आकर्षक
लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका
प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड
शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१९२ ■ मंगळवार २२ एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


बॉम्बे
चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

## महाराष्ट्रात खरंच राजकीय भूकंपाची तयारी? ठाकरे चर्चेनंतर पवार काका-पुतण्यामध्ये भेट

**मुंबई दि. २१(प्रतिनिधी) : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उध्दव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या संभाव्य भेटीकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. त्याचवेळी पवार काका-पुण्याने देखील सर्वांचे लक्ष वेधले आहे. पुण्यात बैठकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार साखर उद्योगावर चर्चा करण्यासाठी बैठक झाली. बैठक संपल्यानंतर देखील ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात बराच काळ चर्चा झाली. महिनाभरात या-ना-त्या कारणाने पवार काका-पुतण्यात तीन वेळा भेट झाली. त्यामुळे आता सहाजिकच राजकीय पटलावर ठाकरे बंधूंच्या पाठोपाठ पवार काका-पुतणे एकत्र येणार का, अशी चर्चा होऊ लागली आहे.**



पुण्यात सोमवारी वंसतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजाबाबत बैठक झाली. बैठकीत शरद पवार आणि अजित पवारांसोबत इन्स्टिट्यूटचे काही अधिकारी देखील उपस्थित होते. या बैठकीनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात काहीकाळ चर्चा झाली. ही चर्चा नेमकी काय झाली, याचे उत्तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. पवार कुटुंबातील साखरपुडा कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार एकत्रित भेटल्यामुळे राजकीय क्षेत्रात चर्चा झाली. त्यावर अजित पवार म्हणाले, साखरपुडा कार्यक्रम हा पुर्णत: पवार कुटुंबाचा वैयक्तिक आणि कौटुंबिक विषय आहे. इतरांनी त्यावर चर्चा करायला नको. त्याचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. ज्येष्ट नेते शरद पवार विविध संस्थात्मक कार्यक्रमांना उपस्थित असतात. त्यामागील उद्देश सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीचा असतो, असे अजित यांनी स्पष्ट केलं.

**काही वेळा एकत्र बसणे गरजेचे : अजित पवार**

आज पार पडलेली बैठक महत्वाची होती. त्यात कृषी आणि शिक्षण क्षेत्रात (पान ४ वर)



## पोप फ्रान्सिस यांचे निधन

वॉशिंग्टन, दि.२१- रोमन कॅथलिक चर्चचे पहिले लॅटिन पोप फ्रान्सिस यांचे निधन झाल्याची माहिती व्हॅटिकनकडून देण्यात आली आहे. सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांचे निधन झाले. त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य रोम येथील चर्चच्या सेवेसाठी वेचले. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्ये शिकवली. तसेच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असे म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातले वृत्त दिले आहे. एपीने पोप फ्रान्सिस यांचे निधन झाल्याची (पान ४ वर)

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धेत बोराडी ग्रामपंचायतीला राज्यस्तरीय द्वित्तीय पुरस्कार

**धुळे, दि.२१- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२३-२०२४ च्या स्पर्धेत ग्रामपंचायत गटात जिल्ह्यातील बोराडी, ता. शिरपूर येथील ग्रामपंचायतीस राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळाला. याबद्दल ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर पेंढारकर यांना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.**

नागरी सेवा दिनानिमित्त सह्याद्री राज्य अतिथिगृह, मुंबई येथील सभागृहात राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२३-२०२४, सन २०२४-२०२५ चा



पारितोषिक प्रदान समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमांस मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक, यशदाचे अतिरिक्त महासंचालक राहुल रंजन महिवाल आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पेंढारकर, सरपंच सुखदेव भिल, उपसरपंच राहुल रंधे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. बोराडी गावातील (पान ४ वर)

## जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेवर प्रगती पॅनेलचे वर्चस्व विरोधकांना एकही जागा नाही; विजयी उमेदवारांचा जल्लोष

**धुळे, दि.२१- धुळे जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत प्रगती पॅनलने सर्व पंधरा जागांवर यश मिळविले. माघारीअंती प्रगती पॅनलचे दोन उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. त्यानंतर उर्वरीत १३ जागांसाठी रविवारी मतदान झाले. सोमवारी सकाळी शहरातील क्युमाईन क्लबसमोर असलेल्या कोतवाल सभागृहात मतमोजणी झाली. त्यावेळी ३८ मते बाद ठरले. प्रगती पॅनलचे सर्व उमेदवार विजयी झाल्याने जल्लोष करण्यात आला. विजयी उमेदवारांच्या पाठीराख्यांनी गुलालाची उधळण करीत एकमेकांना पेढे भरवित आनंद व्यन्त केला.**



धुळे जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीसाठी रविवारी मतदान झाले. एकुण मतदारांपैकी ८५ टक्के मतदारांनी मतदान केले. सोमवारी क्युमाईन क्लब समोरील कोतवाल सभागृहात मतमोजणी झाली. पतसंस्थेच्या सर्वसाधारण गटातुन दहा सदस्य निवडुन दयायचे होते. या गटात १२ जणांनी आपले भाग्य आजमावले. सर्वसाधारण गटाच्या मतमोजणीत ९ हजार १४० मतांमध्ये ३८ मते बाद ठरली. विजयी उमेदवारांमध्ये संजयकुमार पाटील यांना ९०६, कल्पेश माळी (पान ४ वर)

## मो. सायकलची धडक एक ठार; एक जखमी

धुळे, दि.२१- धुळे तालुक्यातील अजनाळे गावाजवळ पुढे चालणाऱ्या मोटर सायकलला मागुन भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात एक ठार तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.जितेंद्र जिभाऊ खैरनार यांनी दि.२० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, मालेगाव ते कुसुंबा रस्त्यावरील अजनाळे गावाजवळून जिभाऊ लक्ष्मण खैरनार व भटू भुरा पवार (वय ६०)रा.काष्टी. ता.मालेगाव,जि.नाशिक हे दोघेही मोटर सायकल क्र.एमएच ४१/बीजे-२२५० घेवून जात असतांना मागुन भरधाव येणारी दुचाकी क्र.एमएच १८/बीएच- १२२२ वरील दुचाकीस्वाराने मागुन जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.

## दोंडाईचात भंगार गोडाऊनला आग; लाखोंचे नुकसान रहिवासी वस्तीत गोडाऊन असल्याने नागरिकांत नाराजी

**दोंडाईचा, दि.२१ (प्रतिनिधी) - येथील धुळे बायपास रस्त्यावरील मुंबई नगरकडे जाणाऱ्या रस्त्यात लगत गुलमोर कॉलनीमधील भंगार गोडाऊन भिषण आग लागल्याची घटना घडली आहे. या गीत भंगार गोडाऊन मालकाचे मोठे नुकसान झाले. रहिवासी वस्तीमध्ये गोडाऊन असल्याने परिसरातील नागरिकांची नाराजी बघायला मिळाली.**

येथील भंगारच्या गोडाऊनला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या गोडाऊन मध्ये प्लास्टिकचे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने आगीच्या



ज्वाळा व धूर वाढल्याचे दिसून आले. या घटनेची माहिती येथील ग्रामस्थांनी अग्निशामक दलाला दिली. यानंतर अग्निशमन दलाच्या बंबाकडून आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. मात्र, तोपर्यंत भंगार गोडाऊन मधील साहित्य जळून खाक झाले. या आगीचे कारण समोर आलेले नाही. दोंडाईचा शहरातील मोहम्मदिया नगरच्या रस्त्याकडे जाणारे गुलमोहर कॉलनीत भंगार गोडाऊन मध्यरात्रीच्या अडिच वाजेच्या सुमारास (पान ४ वर)

## अवधान येथे महिलेची सोनपोत लांबविली

धुळे, दि.२१ - धुळे तालुक्यातील अवधान गावातून पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोनपोत दुचाकीवर मागे बसलेल्या इसमाने हिसकावून पळून गेल्याची घटना घडल्याने परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.पिडीत महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, अवधान गावातील श्री स्वामी समर्थ नगरातील सदानंद प्रोव्हिजन येथून शैलाबाई संजय मोरे ही महिला दि.१९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास जात असतांना त्यांच्या मागुन दुचाकीवर तोंडाला मास्क लावलेले दोघे जवळ आले. त्यापैकी दुचाकीवर मागे बसलेल्या इसमाने गळ्यातील सोन्याची मंगलपोत हिसकावून पळून गेले. मोहाडी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## कॉरिडॉर प्रकल्पाला चालना द्या! कृती समितीचे आमदारांना साकडे

**धुळे, दि.२१- धुळे जिल्ह्यातील दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पाला लवकर सुरुवात करावी, त्याला चालना द्यावी यासाठी कॉरिडॉर विकास समितीचे सदस्य यांनी आमदार पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे.**

दिल्ली मुंबई इंडस्ट्रीज कॉरिडॉर प्रकल्पासाठी समिती गेल्या दहा वर्षापासून रणजीत भोसले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करीत आहे. सदर प्रकल्पाच्या भूसंपादनाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाला चालना देण्यात यावी तसेच भूसंपादन लवकर करण्यात यावे यासाठी शिष्टमंडळाने धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल, ग्रामीणचे आमदार राघवेंद्र भदाने यांची भेट घेऊन त्यांना प्रकल्प विषयी सविस्तर माहिती दिली. (पान ४ वर)

## भरधाव बोलेरोची धडक दोन विद्यार्थीनी जखमी

धुळे, दि.२१-शिरपूर तालुक्यातील उमर्दा गावा जवळ शाळेतुन घराकडे जाणारा विद्यार्थी व विद्यार्थीनीला भरधाव वेगाने जाणाऱ्या बोलेरो वाहनाने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दोन्ही अल्पवयीन विद्यार्थीनी गंभीर जखमी झाल्या. रविंद्र वळवी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, उमर्दा गावातील पुनम रविंद्र वळवी (वय १५) व किंजल करसिंग पाडवी (वय १३) या बोराडी कन्या शाळेच्या दोन्ही विद्यार्थीनी शाळा सुटल्यानंतर उमर्दा गावाकडे दि.१९ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जात असतांना भरधाव वेगाने जाणाऱ्या बोलेरो वाहन क्र. एमएच १९/सीयु-०६३३ ने धडक दिल्याने अपघात झाला.

## नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पंतप्रधान नागरी सेवा उत्कृष्टता पुरस्कार

**नवी दिल्ली, दि.२१-नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी शर्मा यांना हा पुरस्कार जिल्ह्यांचा समग्र विकास श्रेणीत मिळाला.**



१७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त आज विज्ञान भवन येथे केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयाच्या अंतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागामार्फत या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्याने आयुष्मान भारत, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, (पान ४ वर)

## कार उलटून अपघात एक ठार, तिघे जखमी

धुळे, दि.२१- धुळे तालुक्यातील निमडाळे गावाजवळ वळण रस्त्याने जाणाऱ्या वाहनाच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या बाजुला चारीत वाहन उलटून अपघात झाला. या अपघातात वाहनातील एक इसम ठार झाला तर तिघे जखमी झाले आहेत.राजु हसन पटेल यांनी दि.२० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, गोंदुर ते निमडाळे रस्त्याने दि.२० एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास शाबान शब्बीर पटेल रा. गरीब नवाज नगर, कुबा मस्जीद जवळ,शंभर फुटी रोड हे ओमनी कार क्र.एमएच १८/डब्ल्यु-५९४५ घेवून भरधाव वेगाने जात असतांना निमडाळे (पान ४ वर)




## उध्दव, राज ठाकरेंच्या एकत्रीकरणाचे धुळ्यात जाहीर फलक झळकू लागलेत

**धुळे, दि.२१- शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एकत्र यावे. कारण दोन्ही पक्षांचे आदर्श बाळासाहेब ठाकरे असुन विचारांमध्ये समानता आहे. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या वैचारिक भुमिकेत मोठी तफावत आहे. तरीही भाजप आणि राष्ट्रवादीचे अजित पवार एकत्र आले. तेव्हा महाराष्ट्राच्या हितासाठी उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावेत, अशी भावना व्यन्त करणारे फलक धुळे शहरात झळकण्यास सुरूवात झाली आहे. धुळयातील संतोषी माता मंदिर चौकात उभारण्यात आलेल्या फलकाने साऱ्यांचे लक्ष वेधुन घेतले.**

राज्याच्या राजकारणात गेल्या दोन दिवसांपासुन शिवसेनेचे उध्दव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे एकत्र येणार, अशी चर्चा होत आहे. त्यावर आता केवळ राजकीय पक्षांचे नेतेच नव्हे तर स्थानिक पदाधिकारी आणि सर्वसामान्य नागरीक प्रकट होवु लागले आहेत. येणा-या काळात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येणार का याबाबत वेगवेगळया प्रतिक्रीया उमटत (पान ४ वर)

## अ.भा.किसान सभेचे राष्ट्रीय अधिवेशन उत्साहात अॅड.हिरालाल परदेशींची राष्ट्रीय कौन्सिलवर निवड

**शिरपूर, दि.२१- अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अधिवेशन नागापट्टनम येथे उत्साहात पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन राजस्थानचे किसान सभेचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तारासिंग सिधु यांच्या हस्ते झाले. तर खुले अधिवेशनाचे उद्घाटन तामिळनाडूतील कृषि मंत्री एम.आर.के पन्नीसिलयम यानी केले. दरम्यान, किसान सभेच्या राष्ट्रीय कौन्सिलवर अॅड.हिरालाल परदेशी यांची निवड करण्यात आली आहे.**

या अधिवेशनासाठी महाराष्ट्रातील ४३ प्रतिनिधी अॅड.



हिरालाल परदेशी यांच्या नेतृत्वात उपस्थित होते. नागपट्टनम व तामिळनाडूतील किसान सभेने चांगली व्यवस्था ठेवलेली होती. अधिवेशनात विविध ठराव करण्यात आले. १२५ सदस्याची राष्ट्रीय कौन्सिल निवडण्यात आली. महाराष्ट्रतुन कॉम्रेड राजन क्षीरसागर यांची अखिल भारतीय किसान सभेचा अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर राष्ट्रीय कार्यकारणीवर अॅड.हिरालाल परदेशी, कॉम्रेड अशोक सोनारकर यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय कौन्सिलवर अॅड.बन्सी सातपूते, डॉ.महेश कोपुलवार, गिरीश फोंडे, आत्माराम विशे, ओंकार पवार, डॉ.मोहिनी गोरे यांचाही समावेश करण्यात आला आहे. तामिळ नृत्याने वाजतगाजत किसान सभेचे हजारो झेंडे हातात घेऊन रॅलीत हजारो स्त्री, पुरुष सामिल झाले होते. रॅलीचा समारोप प्रचंड जाहीर सभा घेऊन करण्यात आली. सदर अधिवेशनात २० राज्यातील एकुण ५९४ प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील प्रदेशाध्यक्ष हिरालाल परदेशी, राज्य कौन्सिल सदस्य, तुळशीराम पाटील, जिल्हाध्यक्ष सतीलाल पावरा, शि.ता.उपाध्यक्ष किसान सभा भरत सोनार, शिरपूर तालुका कार्याध्यक्ष अविनाश बुधा पावरा हे प्रतिनीधी उपस्थित होते. नंदुरबार जिल्ह्यातील राज्य कौन्सिल सदस्य बुधा पवार, नाशिक जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष भास्करराव शिंदे, सचिव देविदास भोपळे उपस्थित होते.

## मालमत्तेच्या गुन्ह्यातील सराईत चोरट्यांची नंदुरबारमध्ये चौकशी

**नंदुरबार, दि.२१ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधील मागील काही वर्षात चोरी, जबरी चोरी, दरोडा, घरफोडी इ. असे मालमत्तेशी संबंधित गुन्हयांमध्ये पोलीस रेकॉर्डवर असलेल्या आरोपींना संबंधीत पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची स्वतः पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांचेसमक्ष सखोल चौकशी करुन त्यांचे चौकशी पत्र भरुन घेण्याबाबतच्या सुचना पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या.**

त्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी आपआपले हद्दितील रेकॉर्डवरील आरोपींना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची सखोल चौकशी केली असुन जिल्हयाभरातील आतापावेतो १८१ आरोपींची चौकशी करुन त्यांचे चौकशी पत्र भरुन घेण्यात आले आहेत. त्यामध्ये सदर आरोपी सद्यस्थितीत वास्तव्यास असलेल्या ठिकाणाची माहिती, सध्या करत (पान ४ वर)

## ईले.स्कुटीला अपघात एक गंभीर जखमी

धुळे, दि.२१- शहरातील मोहाडी तिखी रस्त्यावरील बी.एस.एन.एल. कार्यालय समोरील रस्त्याने ईलेक्ट्रीक स्कुटीवरून जाणाऱ्या इसमाला दुचाकीस्वाराने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात ईले.स्कुटीवरील पंचेचाळीस वर्षीय इसम जखमी झाल्याची घटना घडली आहे.महेश छबु चौधरी यांनी दि.२० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, तिखी रोडवरील बी.एस.एन.एल ऑफीस समोरील रस्त्याने ईलेक्ट्रीक स्कुटी क्र.एमएच १८/सीएफ- ३६७७ घेवून जात असतांना समोरून भरधाव वेगाने येणारी दुचाकी क्र. एमएच १८/सीडी-३१३६ ने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात महेश चौधरी (वय ४५) हे गंभीर जखमी झाले.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -87,900 रु.+3% GST
सोने- 24 K -95,950 रु.+3% GST
चांदी- 01,0000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## धुळे बाजार समितीत रब्बी धान्यास अपेक्षित दर नाही ; शेतकरी नाराज

**धुळे, दि.२१- धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत सोमवारी मका, ज्वारी, बाजरीची मोठया प्रमाणात आवक झाली. आवक वाढल्याने दरात काहिशी घसरण झाली आहे. साहजिकच शेतक-यांनी नाराजी व्यन्त केली आहे. आगामी काळात अजुन आवक वाढण्याची श्नयता आहे, असे व्यापा-यांचे म्हणणे आहे. व्रतवारीनुसार मका २ हजार रूपये प्रतिक्विंटल तर बाजरीला २ हजार ५०० रूपये प्रतिक्विंटल दर आहे.**

धुळे जिल्हयात सुमारे सव्वा दोन लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगाम घेतला जातो. त्यात गहू, ज्वारी, बाजरी, मका ही



पिके प्रामुख्याने घेतली जातात. सरासरीपेक्षा जास्त पाउस झाल्याने भुगर्भात जलस्तर वाढला. त्यामुळे साहजिकच बहुसंख्य शेतकऱ्यांच्या विहीरींची पाण्याची (पान ४ वर)

## भगा मोहन नगरातून दहा तोळे सोने लंपास

धुळे, दि.२१- शहरातील भगा मोहन नगरातील प्लॉट नं.१७ ब मधील सदस्य घरी नसल्याची संधी साधुन अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले दहा तोळे सोने मध्यरात्री चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.घरमालक हेमलता पांडे आपल्या मुलींकडे वाडीभोकर रोड परिसरात मुक्कामाला गेल्या असल्याची संधी साधुन अज्ञात चोरट्यांनी डाव साधला. या परिसरात रात्री दोन तीन वेळा विज पुरवठा खंडीत करण्याचे धाडक केल्याचे बोलले जाते आहे. पांडे यांच्या घराचे कुलूप तोडलेल्या स्थितीत आढळून आल्याने शेजाऱ्यांनी संपर्क साधुन माहिती दिली. त्यानंतर घटनेची खबर आझाद (पान ४ वर)

## पहिल्या आधारकार्डधारक महिलेला जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने लाडकी बहीण योजनेचे साडेतेरा हजार मिळाले!

**नंदुरबार, दि.२१ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील टेम्भलीच्या महिलेला जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांच्या पाठपुराव्यामुळे लाडक्या बहीण योजनेचे १३ हजार ५०० रुपये मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. देशाच्या पहिला आधार कार्ड धारक महिलेचे बँक खाते अंधेरीला चुकून जोडले गेल्याने घोळ झाला होता. परंतू चुक दुरुस्त करून लोणखेड्याच्या बँकेशी आधार कार्ड लिंक करून देत रक्कम सुपूर्द करण्यात आली.**

भारताचे माजी पंतप्रधान स्व.मनमोहन सिंग यांच्या हस्ते रंजनाबाई सदाशिव सोनवणे (रा.टेंभली ता.शहादा जि.नंदुरबार) यांना देशातील पहिले आधार कार्ड देण्यात आले होते. त्यामुळे देशातील पहिले आधार कार्ड मिळाल्याचा मान त्यांना मिळाला



आहे. त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने अंतर्गत लाभ मिळणेकामी नारी शक्ती दुत अॅपव्दारे अंगणवाडी सेविका यांचेमार्फत नोदणी केली होती. त्यासोबत त्यांनी आधार कार्ड, बँक ऑफ इंडिया शाखा लोणखेडा येथील पासबुक व इतर अनुषंगीक कागदपत्र जोडण्यात आले होते. सदर योजना ही पूर्णपणे आधारकार्डशी संलग्न असल्याने, ज्या बँक खात्याशी लाभार्थ्यांचे आधारकार्ड जोडलेले असेल, त्यामध्ये योजनेची रक्कम जमा होते. परंतु रंजनाबाई सोनवणे यांना सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याचे आढळून आल्याने त्यांनी बँक ऑफ इंडिया शाखा लोणखेडा येथील शाखा व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधला असता, त्यांचे आधार कार्ड हे आयडीबीआय बँकेशी संलग्न असल्याचे आढळून आले. त्यामूळे सदर महिलेने आयडीबीआय बँक शाखेच्या व्यवस्थापक यांच्याशी संपर्क केल्याने असे निदर्शनास आले की त्यांचे आधारकार्ड (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## न्याय व्यवस्थेतील मोठा इतिहास : १८७ वर्षांची शिक्षा

भारतीय न्यायव्यवस्थेत कधीकधी वेगवेगळे अनुभव आलेले आहेत. काही गमतीदार किस्से देखील न्यायव्यवस्थेत घडतात. काही शिक्षा अशा असतात की त्या लक्षात घेतल्यास बलात्कार किंवा अत्याचाराच्या संदर्भात एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिक्षा होऊ शकते याची प्रचिती येते. केरळमध्ये कुन्नूर जिल्ह्यात एका मदरशात शिकविणाऱ्या ३१ वर्षीय शिक्षका विरूद्ध तेथील न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर केलेल्या अत्याचाराची शिक्षा म्हणून १८७ वर्षाच्या सजेचा इतिहास रचला आहे. आतापर्यंत भारतात तरी अशा प्रकारच्या शिक्षेची अंमलबजावणी झालेली नाही. न्यायालयाने सदर शिक्षकाला एकाच गुन्ह्यांसाठी वेगवेगळ्या कलमाखाली वेगवेगळी शिक्षा ठोठावली आहे. ती ठरवताना त्या त्या कलमांचे वेगवेगळे विश्लेषण देखील न्यायाधीशांनी केलेले आहे. नुकत्याच संपलेल्या या खटल्याचा निकाल कुन्नूर न्यायालयात दिला गेला. त्याबद्दल देशभर चर्चा सुरू असली तरी न्यायालयाने आरोपीला दिलेली शिक्षा चुकीची आहे असे कोणीही म्हटलेले नाही. कारण गुन्हाच तसा होता. साधारणपणे आपल्याकडे बलात्कारी आरोपीला जास्तीत जास्त मरेपर्यंत जन्मठेप देण्याची पद्धत आहे. आयुष्यभर संबंधित आरोपी हा तुरुंगात खितपत पडलेला असतो. त्याची दैनंदिनी वेगळीच असते. आम जीवन पद्धती संपलेली असते. जी शिक्षा तो भोगतो त्यात मजुरी, सक्त मजुरी, अशा शिक्षेचा बहुदा समावेश असतो. या आयुष्यात रोज त्याला आपण केलेल्या दुष्कृत्याची आठवण येत असावी. त्याच्या हातून जे काही घडले त्याबद्दल त्याला होणारा पश्चाताप ही सगळ्यात मोठी शिक्षा असते. आणि न्यायालयाची अथवा न्यायव्यवस्थेची तीच अपेक्षा असते. पुढच्यास ठोकर मागचा शहाणा या पद्धतीने अशा शिक्षेकडे समाज बघत असतो जेणेकरून अशा प्रकारचे गुन्हे करण्यास कुणी धजावणार नाही. अलीकडे दिल्लीत घडलेल्या निर्भया प्रकरणा नंतर संसदेचे सभागृह रात्रभर चालले. सर्वानुमते त्यात बलात्काऱ्यास फाशीची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली. तसा कायदा संमत झाला. दिल्लीत त्यावेळी डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या सरकारची सत्ता होती. त्यांच्या सरकार वर प्रचंड दबाव होता. बाहेर हजारो युवक युवती हातात मेणबत्ती घेऊन उभे होते. एक प्रकारे घडवून आणलेली ती कृती होती. त्याचा परिणाम असा झाला की संसदेने तातडीने विधेयक संमत केले. ते सरकारही गेले. नवे आजचे सरकार आले. मात्र बलात्काराच्या गुन्ह्यात कपात झालेली नाही. याचा अर्थ असा आहे की लोकसंख्येने प्रचंड मोठ्या असलेल्या आपल्या देशात निर्ढावलेल्या लोकांची संख्या खूप मोठी आहे. त्यांच्यावर ना घरात, ना शाळेत, ना समाजात कुठल्याही प्रकारचा चांगला संस्कार झालेला नसतो. असे लोक विवेक बुद्धीचा वापर करू शकत नाहीत. त्यांचे मन हे गुन्हेगारी दैनंदिनीने भरलेले असते. त्यातून समाजाने जे त्याज्य ठरवलेले आहे अशीच कृत्ये घडतात. त्याची परिणती शिक्षेत होते. तो शिक्षा भोगतो पण त्यातून पुढचा शहाणा होत नाही हा चिंतेचा विषय आहे. अशा प्रवृत्तींना पोसणारी सुद्धा एक जमात असते. ती बहुदा राजकीय क्षेत्रात अधिक असते. आजच्या राजकारणात तर पुढाऱ्यांच्या दिमतीला गुंड पुंड आणि, चारित्र्याने भ्रष्ट असे लोकच मोठ्या प्रमाणावर दिसतात. त्यांचे उद्योग अशा प्रकारे चाललेले असतात. त्यांना संरक्षण देणे, त्यांचे पालनपोषण करणे, त्यांच्या गरजा भागविणे, आणि त्यांचा आपल्या अवैध राजकारणासाठी वापर करणे अशी आजच्या राजकारणाची रचना आहे. यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये मुरलेले लोकच स्थानिक स्वराज्य संस्था असतील, राज्यसंस्था असतील, पक्ष संघटना असतील त्यात मोठ्या प्रमाणावर दिसतात. त्यांचा वावर हा मोठ्या शहरात अंडरवर्ल्ड म्हणून होत असतो. तर छोट्या गावात गुंडांची टोळी किवा बदफैली तरुणांचा समूह अशी त्यांची संभावना होत असते. हे बहुदा बेकार असतात, शिकलेले असतात, परंतु रोजगार नसल्यामुळे भरती होत असतात. ती बहुदा बहुजनांची मुले असतात. त्यांना भविष्याची चिंता नसते. त्यांच्या पालकांची मानसिकता आपला पाल्य साहेबांच्या दिमतीला असल्यामुळे चिंता नाही अशी असते. ते अभिमानाने आपल्या दिवट्या चिरंजीवांचे पराक्रम आणि साहेबांच्या समूहात त्याची असलेली उठ बैस यावर दुसऱ्यांना माहिती देत असतात. जेव्हा एखाद्या गुन्ह्यामध्ये तो अडकतो. तोवर साहेबांच्या कामाचा राहिलेला नसतो त्याची उपयोगिता संपलेली असते. त्यामुळे साहेब त्याला वाचविण्याच्या भानगडीत पडत नाहीत. पर्यायाने संबंधित तरुण हा हतबल होतो. वेळ हातातून निघून गेलेली असते. आणि त्याच्या वाट्याला वेगळेच जगणे येते. नवनिर्मित धर्मांध प्रवृत्तीच्या ज्या काही संघटनांचे जे काही शिलेदार आहेत. त्यांना सत्ताधीश पोसत असतात. त्यांच्या हाताशी ही बहुजनांची पोरे समाजात धुडगूस घालतात. त्यांचा वापर धर्माधर्मात द्वेष निर्माण करण्यासाठी होतो. त्याची मानसिकता किंवा त्याच्यातील ताकद जेव्हा ओसरते तेव्हा तो एकटाच रस्त्याच्या चौफुलीवर उभा असतो. कारण त्याची उपयोगीता संपलेली असते. महाराष्ट्रात अलीकडे जे काही गुन्हेगारी जग फुलत आहे ते याच प्रक्रियेचे द्योतक म्हणावे लागेल. मात्र याची चिंता फारशी कोणी करीत नाही. जेव्हा त्यांच्या घरातील किंवा कुटुंबातील तरुणांचा नंबर येतो तेव्हा त्यांचे डोळे उघडतात. मात्र तेव्हा वेळ निघून गेलेली असते. अशा प्रवृत्तीच्या खात्यावर बहुदा छेडछाडीचे बलात्काराचे किंवा मुलींवरील अत्याचाराचेच गुन्हे अधिक असतात.

केरळ मधील कुन्नूर जिल्ह्यातला महंमद रफी नावाचा शिक्षक हा या वर्गातील नाही. पण तो शिक्षण क्षेत्रातील असल्यामुळे या वर्गापेक्षाही डोळे विस्फारून टाकणारा गुन्हेगार आहे. कारण शिक्षण क्षेत्र हे आपण पवित्र मानतो. त्या क्षेत्रात अशा प्रवृत्तीचे लोक असावेत याबद्दल चिंता वाटते. जे कोणी अशा प्रकारचे मदरसे किंवा शिक्षण संस्था चालवितात त्यांना विवेक बुद्धी असते की नाही याबद्दल शंका वाटावी अशी परिस्थिती आहे. महाराष्ट्रात तर जेव्हापासून खाजगी शिक्षण संस्थांचा बाजार झाला तेव्हापासून या क्षेत्रात कल्पना करवणार नाही अशा पद्धतीचे लोक घुसले आहेत. ते शिक्षण चालक म्हणून आहेत, शिक्षक म्हणून आहेत, शिक्षकेतर कर्मचारी म्हणूनही आहेत. अशा लोकांची प्रवृत्ती नेमकी काय असते याबद्दलचे उदाहरण नुकतेच आपल्याकडे बदलापूरच्या शाळेत घडले. दोन मुलींवर अत्याचार करणारा आरोपी पोलिसांनी मारून टाकला. आणि प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. कुणाच्या इशारावर हे घडले असेल आणि कोणाच्या हितसंबंधात असलेली ती शिक्षण संस्था असेल त्यावर फारशी काही प्रतिक्रिया व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. सरकारमधील संबंधितांच्या जवळचे असलेल्या लोकांची ही संस्था आहे. त्यात असे घडल्यामुळे ती आपण वाचवली पाहिजे या उद्देशाने आरोपीचा एन्काऊंटर घडला. अशी आता चर्चा सुरू आहे. जे काही घडले असेल ते असेल मात्र महाराष्ट्र आता या प्रवृत्ती पासून फार दूर नाही हे स्पष्ट झालेले आहे. कुन्नूर चा मोहम्मद रफी हा शिक्षक यापूर्वी देखील एका शालेय मुलीच्या अत्याचाराच्या प्रकरणात शिक्षा भोगत होता. पॅरोलवर सुटून आल्यानंतर त्याने दुसरा प्रमाद घडवून आणला. दोन वर्षांपर्यंत १४ वर्षाच्या मुलीवर त्याने बलात्कार केला. जेव्हा तिच्या हालचाली बदलल्याचा घरच्यांना संशय आला तेव्हा कुटुंबीयांनी तिला समुपदेशन केंद्रात नेले आणि सारा प्रकार उघडकीस आला. नंतर रीतसर खटला चालला. त्यात पोक्सो कायद्याअंतर्गत निरनिराळ्या कलमाखाली पन्नास वर्षे, पस्तीस वर्षे, २५ वर्षे, वीस वर्षे, दोन वर्षे अशा प्रकारच्या शिक्षा न्यायाधीशांनी ठोठावल्या. हे प्रकरण दुर्मिळातील दुर्मिळ असल्याचे देखील न्यायाधीशांनी नमूद केले. अशा प्रकारची शिक्षा भारतीय न्याय व्यवस्थेत आतापर्यंत दिली गेलेली नाही.

आपल्या देशाच्या आणि जगाच्या न्यायव्यवस्थेचा मोठा इतिहास आहे. प्राचीन युग, मध्ययुग आणि आधुनिक युग असे तीन टप्पे न्यायव्यवस्थेत आहेत. आधुनिक काळाच्या आधीच्या संपूर्ण व्यवस्थेत राजेशाही होती आणि ती बहुदा लोकाभिमुख असायची. न्यायाची बूज राखणारी होती. अशा काही घटना आपल्या देशात घडलेल्या आहेत. ब्रिटिशांच्या राजवटीनंतर स्वातंत्र्योत्तर काळात न्याय व्यवस्थेने कूस बदलली. सांप्रत काळात (पान ३ वर)

# एकगठ्ठा मतांसाठी प.बंगालमध्ये बांगलादेशींची घुसखोरी : विहप

**धुळे, दि.२०- पश्चिम बंगालमध्ये घटनाबाहय कारवाया होत आहेत. आपली एकगठ्ठा मते सुरक्षित राहण्यासाठी बांगलादेशी नागरीकांची घुसखोरी सहन केली जात आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी विश्व हिंदु परिषदेतर्फे करण्यात आली. विश्व हिंदु परिषदेच्या पदाधिका-यांनी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करीत प्रशासनास निवेदन दिले.**

पश्चिम बंगाल मध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारतर्फे घटनाबाह्य कामे होत आहेत. एकगठ्ठा मते सुरक्षित राहण्यासाठी पंश्चिम बंगाल मध्ये बांगली नागरीकांची घुसखोरी सहन केली जात आहे. घुसखोर त्यासाठी बनावट आधार कार्डचा वापर करीत आहेत. बांग्लादेशातील नागरीकांच्या घुसखोरीमुळे पश्चिम बंगालसह इतर ठिकाणी भारतीय नागरीकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना हेतूता त्रास दिला जात आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात हिंदुत्ववादी संघटना आणि हिंदू नागरीकांना लक्ष्य केले जात आहे. या कृत्याचा आम्ही निषेध करतो. असे म्हणत विश्व हिंदू परिषद, बजरंग दलतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आली. घुसखोरांच्या सर्व कारवाया उपयशी करण्यासाठी प्रयतक करावे, अशी मागणी निवेदनातुन करण्यात आली. निवेदन देतांना विश्व हिंदू परिषदेचे राजेश मिश्र, योगीराज मराठे, भरत देसले, हेमंत कचवे, दिलीप सूर्यवंशी, प्रितेश अग्रवाल विजय पाच्छापूरकर, हिरामण गवळी यांच्यासह हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# प्रगत यंत्रे आणि ज्ञान उपयुक्त ठरणार बालरोग तज्ज्ञ परिषदेत मान्यवरांचा सूर

**धुळे, दि.२०- खान्देशकॉन परिषदेत मिळालेली माहिती बालरोग तज्ञासाठी उपयुक्त ठरणार आहे. यात प्रामुख्याने लसीकरण, नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्याने त्याचा न्नकी लाभ होईल, अशी भावना डॉक्टरांनी व्यक्त केली. बालरोग तज्ञ असोसिएशनतर्फे धुळयात दोन दिवसीय खान्देशकॉन परिषद झाली. स्वर्ण स्पर्श रिर्साट येथे झालेल्या परिषदेला बहुसंख्य डॉक्टर उपस्थित होते.**

बालरोग तज्ञ असोसिएशनतर्फे धुळ्यात खान्देशकॉन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्वर्ण स्पर्श रिर्साट येथे झालेल्या परिषदेला खानदेशातील बहुसंख्य डॉक्टर उपस्थित होते. यात कलकत्ता येथील डॉ.आतानु भद्रा, डॉ.पारव मोडे, डॉ.अमोल पवार, डॉ. रवींद्र सोनवणे, डॉ. रवी वानखेडकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.तुषार कानडे, डॉ.दादाभाई पाटील, डॉ.अविनाश सैंदाणे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. या परिषदेतुन नवीन अदयावत उपकरणे आणि सुधारीत उपचार पध्दतीची माहिती बालरोग तज्ञांना मिळाली. त्याचा लाभ न्नकीच होईल, असा आशावाद यावेळी व्न्नत करण्यात आला. या परिषदेत प्रामुख्याने लसीरकरणावर भर देण्यात आला. विविध लसीविषयी माहिती बालरोग तज्ञांना देण्यात आल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# धुळे ग्रामीणात भाजपकडून मंडल अध्यक्ष मासुळे, माळी, पवार, निकम यांची नियुक्त



**धुळे, दि. २१ (प्रतिनिधी) : जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भारतीय जनता पक्षातर्फे धुळे ग्रामीण मध्ये चार मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. धुळे तालुक्यातील नगाव येथे पार पडलेल्या या प्रक्रियेत छोटू मासुळे, दिनेश माळी, प्रविण पवार, रविंद्र निकम यांची निवड करण्यात आली. या निवडीला आमदार राम भदाणे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबन चौधरी आणि इतर पदाधिका-यांनी सहमती दर्शविली. मंडल अध्यक्षांच्या निवडीमुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळेल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.**

येणाऱ्या काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणुक होणार आहे. त्यासाठी भारतीय जनता पक्षाने संघटन वाढीकडे लक्ष दिले आहे. संघटन पर्वातर्गत धुळे ग्रामीण मध्ये देखील मंडळ अध्यक्षांची निवड करण्यात आली. धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, उपाध्यक्ष प्राध्यापक अरविंद जाधव यांच्यासह इतरांनी हि निवड बिनविरोध व्हावी म्हणुन प्रयत्न केले. पक्षाच्या नवीन धोरणानुसार शंभर मतदान केंद्रासाठी एक मंडल अध्यक्ष निवडण्या आला. गंगामाई अभियांत्रिकी महाविदयालयाच्या आवारात निवडणुक निरीक्षक चंद्रजित पाटील, शैलेंद्र अजगे, किशोर सिंघवी यांनी निवड प्रक्रीया पार पाडली. त्यात नेर मंडल अध्यक्षपदी छोटु मासुळे, फागणे मंडल अध्यक्षपदी दिनेश माळी, शिरूड मंडळ अध्यक्षपदी प्रविण पवार तर वलवाडी मंडल अध्यक्षपदी रविंद्र निकम यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब रावण भदाणे, भाऊसाहेब देसले, संजय शर्मा, तालुका अध्यक्ष देवेंद्र पाटील, शंकर खलाणे, रामकृष्ण खलाणे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# धुळ्यात शॉटी व्हॉलीबॉल स्पर्धा जिल्ह्यातील १६ संघांचा सहभाग

**धुळे, दि.२१- खेळाच्या माध्यमातुन शारिरीक आणि मानसिक आरोग्य चांगले राहते. त्यामुळे प्रत्येकाने खेळण्याचा छंद जोपासला पाहिजे. निरनिराळया वयोगटातील नागरीकांनी खेळाकडे वळावे यासाठीच शॉटी हॉलीबॉल स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले होते. स्पर्धा पाहण्यासाठी हजारो नागरीक उपस्थित होते.**

धुळे शहरातील गरूड मैदानावर निरनिराळ्या प्रकारच्या स्पर्धा होतात. जिल्हा शॉटी हॉलीबॉल संघटनेतर्फे दोन दिवसीय स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धे साठी जिल्हयाच्या निरनिराळया गावांमधील सोळा संघांनी सहभाग नोंदविला. शनिवारी आणि रविवारी बाद पध्दतीने या स्पर्धतील सामने खेळविण्यात आले. पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणास लावले.

## नंदुरबारला आज तालुका स्तरीय लोकशाही दिन

नंदुरबार, दि.२१ (प्रतिनिधी) - तालुकास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असून माहे एप्रिल २०२५ महिन्यातील तालुकास्तरावर लोकशाही दिन २२ एप्रिल रोजी दुपारी ११ वाजता तहसिल कार्यालय, नंदुरबार आयोजित करण्यात आला असल्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा यांनी पत्रकान्वये कळविले आहे. जनतेच्या तक्रारी व गाऱ्हाणी सोडविण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरावर आणि पहिल्या सोमवारी जिल्हा स्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात कामासबंधी वैयक्तिक तक्रारी/निवेदन सादर करावयास असल्यास प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या लोकशाही दिनात दाखल कराव्यात. तालुकास्तरीय लोकशाही दिनात दाखल तक्रार/निवेदन यावर समाधान न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार/निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे उपस्थित रहावे.

# थाळनेर पीक संरक्षण सोसायटी अध्यक्ष जमादार, उपाध्यक्ष तेले

**धुळे, दि.२१-शिरपुर तालुक्यातील थाळनेर पीक संरक्षण सोसायटीच्या अध्यक्षपदी एकनाथ जमादार आणि उपाध्यक्षपदी राजाराम तेले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पीक संरक्षण सोसायटीच्या निवडणुकीत शेतकरी परिवर्तन पॅनलने सत्ता मिळवितांना पंचायत समितीचे उपसभापती विजय बागुल, सरपंच मेघा निकम यांच्या पॅनलला पराभवाची धुळ चारली. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या होणा-या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर ही निवडणुक प्रतिष्ठेची ठरविण्यात आली होती.**

शिरपुर तालुक्याच्या राजकारणात थाळनेर महत्वाची भुमिका बजावते. येणाऱ्या काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणुक होणार आहे. त्यामुळे गावपातळीवरील निवडणुका स्थानिक नेत्यांनी प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. अशा परिस्थितीत थाळनेर येथील पीक संरक्षण सोसायटीची निवडणुक झाली. या निवडणुकीत डॉ. भगवान तलवारे, माजी सरपंच प्रशांत निकम, विकास सोसायटीचे अध्यक्ष रमेश तलवारे यांनी शेतकरी परिवर्तन पॅनल दिले होते. या पॅनलने सत्ता हस्तगत करता येईल एवढया जागा जिंकतांना शिरपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती विजय बागुल, सरपंच मेघा निकम, पिक संरक्षण सोसायटीचे मावळते अध्यक्ष किशोर पाटील यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी विकास पॅनलचा पराभव केला. सभागृहात पीक संरक्षण सोसायटीच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष पदाची निवडणुक घेण्यात आली. निवडणुक निर्णय अधिकारी बी.डी.पाटील यांच्याकडे अध्यक्षपदासाठी एकनाथ जमादार आणि उपाध्यक्षपदासाठी राजाराम तेले यांचेच अर्ज दाखल झाले. त्यामुळे या दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडीवेळी पिक संरक्षण सोसायटीचे संचालक रमेशसिंग जमादार, किशोर पाटील, विक्रम पाटील, नंदलाल मराठे, अरुण शिंदे, शेखर शिंदे,अण्णा बोरसे, चंद्रकांत तेले, हेमंत चौधरी, सुरेखाबाई मराठे, ताराबाई पाटील उपस्थित होते. निवड बिनविरोध झाल्यानंतर विजेत्यांच्या पाठीराख्यांनी गुलालाची उधळण करीत आनंद व्न्नत केला. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते अजितसिंग जमादार, भोजूसिंग जमादार, डोंगर कोळी, महेंद्र बाविस्कर,राकेश पाटील, राजेंद्र सावळे पस्थित होते.

## इंद्रप्रस्थ नगरमधून दुचाकी लंपास

धुळे, दि. २१- देवपूरातील इंद्रप्रस्थ नगरातील गौरी कांडप केंद्र जवळ लावलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.प्रमोद वसंत पाटील यांनी दि.२० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, गौरी कांडप जवळ दुचाकी क्र.एमएच १८/बीक्यु- ६३४१ लावलेली होती. अज्ञात चोरट्याने दि.१९ एप्रिल रोजी रात्री आठ ते अकरा वाजेच्या कालावधीत पन्नास हजार रूपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जाहीर नोटीशीस हरकत

श्री.गणेश नामदेव फुलपगारे, रा.गल्ली नं.१३, जुने धुळे, धुळे व श्री.राजेंद्र लोटन गवळे, रा.गवळेनगर, देवपूर, धुळे, जि.धुळे यांनी दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या दि.१६/०४/२०२५ रोजीच्या नोटीशीस श्रीमती निर्मलाबाई जवनीतसिंग राजपूत, रा.अजंदे बु., पो.होळनांथे, ता.शिरपूर, जि.धुळे यांचेकडून जाहीर हरकत घेण्यात येते की,

१) उपरोक्त जाहीर नोटीशीद्वारे आपण गाव देवपूर, ता.जि.धुळे येथील नगर भूमापन क्र.६७०५ (७/१२ उताऱ्याप्रमाणे जुना नं.१०४/पैकी प्लॉट नं.४५), क्षेत्र ५२० चौरस मीटर या मिळकतीबाबत १) कमलबाई आनंदसिंग राजपूत, २) जयपाल आनंदसिंग सिसोदीया (राजपूत), ३) शारदापेन महेंद्रसिंग जमादार, ४) भारती प्रविणसिंग राजपूत, ५) कल्पना आनंदसिंग राजपूत व ६) कविता आनंदसिंग राजपूत, सर्व रा.होळनांथे, ता.शिरपूर, जि.धुळे यांचेशी खरेदीचा सौदा केल्याचे नमूद करुन या व्यवहारास हरकती मागविलेल्या आहेत.

२) या व्यवहारास माझी तिव्र हरकत आहे. कै.कमलाबाई उत्तमसिंग राजपूत ह्या उपरोक्त मिळकतीच्या मुळ मालक होत्या. त्या दि.३१/१२/२०१२ रोजी निपूत्रीक मयत झालेल्या आहेत. त्यांचे पती कै.उत्तमसिंग पवलसिंग उर्फ दौलतसिंग राजपूत हे देखील दि.२२/०१/२००४ रोजी मयत झालेले आहेत. कै.कमलाबाई उत्तमसिंग राजपूत यांनी त्यांच्या हयातीतच मृत्यूपत्र केलेले असून सदर मिळकत मालकीहक्काने मला दिलेली आहे. त्यामुळे ही मिळकत आज रोजी माझ्या मालकीची असून ईतर कोणालाही या मिळकतीबाबत व्यवहार करण्याचे हक्क व अधिकार नाहीत.

३) विशेष म्हणजे कै.कमलाबाई व कै.उत्तमसिंग यांचा वारस दाखला मिळण्यासाठी आपल्याशी तथाकथीत व्यवहार केलेले नं.२) श्री.जयपाल आनंदसिंग सिसोदीया यांनी धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो., वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दि.कि.अ.नं. ६३५/२०१८ चा अर्ज दाखल केलेला होता. परंतू श्री.जयपाल सिसोदीया यांनी दाखल केलेला वारस दाखल्याचा अर्ज मे.न्यायालयाने दि.१३/०३/२०२४ रोजीच्या आदेशाने रद्द केलेला आहे.

४) असे असतांही कै.कमलाबाई यांचे श्री.जयपाल सिसोदीया (राजपूत) व त्यांचे कुटूंबीय हे वारस असल्याची चूकीची नोंद वरनमूद नगर भूमापन क्र.६७०५ या मिळकतीवर घेण्यात आलेली आहे. वास्तविक सदरची नोंद बेकायदेशीर असून त्याविरुध्द अपीलदेखील मी धुळे येथील मे.अधिक्षक सो., भुमि अभिलेख यांच्या न्यायालयात दाखल केलेले असून ते प्रलंबीत आहे.

५) उपरोक्त मिळकत कमलबाई आनंदसिंग राजपूत, जयपाल आनंदसिंग सिसोदीया (राजपूत) वगैरे यांच्या मालकीची कधीही नव्हती व आजदेखील नाही. तसेच मिळकतीच्या मुळ मालकांचे ते वारस असल्याचेदेखील मे.न्यायालयाने फेटाळून लावलेले आहे. परंतू सदर बाब लपवून श्री.जयपाल सिसोदीया (राजपूत) वगैरे हे ह्या मिळकतीची घाईगर्दीने विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत. यापूर्वीदेखील मी दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दि.२७/०२/२०२४ रोजी जाहीर नोटीस देवून सदरहू बाब जाहीररित्या प्रसिध्द केली होती.

६) तरी आपल्या नोटीशीत नमूद मिळकतीबाबत कमलबाई आनंदसिंग राजपूत, जयपाल आनंदसिंग सिसोदीया (राजपूत) वगैरे यांच्याशी ते मिळकतीचे मालकच नसल्याने कोणताही व्यवहार करु नये. सदर व्यवहारास माझी मिळकतीची मालक म्हणून हरकत आहे. याउपरही आपण तसा व्यवहार केल्यास तो माझ्यावर अथवा मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर हरकत असे.

सदरची जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व सूचनेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. **शिरपूर, दिनांक २१/०४/२०२५.**

**अॅड.निखिल एस.सोनवणे,** शिरपूर, जि.धुळे.

## शिवाजीरोड अंधारात!

धुळे- शहरातील पांझरा किनारी असलेल्या अग्रवाल भवन ते कालिका माता मंदिरापर्यंतच्या शिवाजी रोडवरील पथदिवे गेल्या अनेक दिवसापासून बंद आहेत. परिणामी रात्रीच्या वेळी पादचाऱ्यांच्या लुटीचे प्रकार घडत आहेत. वारंवार तक्रारी करुनही म नपा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चोरांचे फासले आहे.
















## पान १ वरुन

## खरंच राजकीय भूकंपाची तयारी?

एआयचा (कृत्रिम बुध्दीमत्तेचा) कसा प्रभावी वापर करता येईल, यावर विस्ताराने चर्चा झाली. शेतक-यांना थेट फायदा होईल, अशा तंत्रज्ञानाचा वापर केला जावा, असा ठाम विचार या बैठकीतून समोर आलास असेही अजित पवार यांनी सांगितले. अशा कामांसाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र चर्चा करणे गरजेचे असते, असेही अजित पवार म्हणाले.

**दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आनंद : रोहित पाटील**

राज्यात उद्धव आणि राज ठाकरेंच्या मनोमिलनाचे वारे वाहत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पाटील यांनी, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास आनंद होईल, अशी प्रतिक्रिया दिली आहे. सर्व संघटना एकत्र आल्यास महाराष्ट्रात एकसंघ मजबुती निश्चितपणाने येईल,असा विश्वासही आमदार रोहित पाटील यांनी सांगलीत व्यक्त केला.

**जेवढे प्रेम, तेवढाच कडवटपणा : संजय राऊत**

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे शिवसेना गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले, ते एकत्र आलेलेच आहेत. आम्हाला आतापर्यंत कोणाला भेटताना तुम्ही पाहिलात का? बोलताना, चहा पिताना पाहिलत का? एकत्र व्यासपिठापण नाही. आम्ही नाही भेटणार. आमच्याकडे काही वसंतदादा शुगर इंस्टीट्यूट नाही. आमच्याकडे रयत शिक्षणसंस्था नाही. आमच्याकडे काहीच नाही. संस्थात्मक कामांसाठी भेटायचे की मनातले बोलण्यासाठी भेटायचे, हा त्यांचा प्रश्न आहे. आमचे प्रेम जितके, तितकाच कडवटपणा देखील असतो. त्यात भेसळ नसते, हे लक्षात घ्या.

## पोप फ्रान्सिस यांचे निधन

माहिती दिली आहे. व्हॅटिकनकडून एक व्हिडीओ संदेश देण्यात आला. त्या संदेशात पोप फ्रान्सिस यांच्या निधनाचे वृत्त देण्यात आले. पोप फ्रान्सिस यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आज सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.

## राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार

आजुबाजूची पडीक जमीन हरीत क्षेत्र करुन पर्यटकांना आकर्षित केले. यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होऊन बेरोजगारांना रोजगारच्या संधी उपलब्ध करुन दिली. याबरोबरच ग्रमपंचायतीने विविध उपक्रम राबविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमान स्पर्धेतील ग्रामपंचायत गटात बोराडी ग्रामपंचायतीस राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले आहे. बोराडी ग्रामपंचायतीची विकासाची वाटचाल व कार्यकुशलता पाहता वर्ष २०२३-२०२४ मध्ये गतिमान प्रशासन या गटात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या बोराडी गावातील प्रशासकीय कारभार बघणारे ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पेंढारकर यांना गौरविण्यात आले. या गौरवानंतर पेंढारकर म्हणाले की, या पुरस्कारामुळे जबाबदारी अधिक वाढली असून पुढील काळात अधिक जोमाने काम करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. या पुरस्कारासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, शिरपूरचे गटविकास अधिकारी प्रदिप पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या पुरस्काराबद्दल पेंढारकर यांचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अमरीशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा, जिपचे माजी अध्यक्ष डॉ तुषार रंधे यांनी अभिनंदन केले.

## प्रगती पॅनेलचे वर्चस्व

यांना ९८५, प्रविण कुमावत यांना ८९२, भरत देसले यांना ८८६, उज्वल भामरे यांना ८७१, धनराज पाटील यांना ८५८, सुशिल सोनवणे यांना ८५२, महेंद्र पाटील यांना ८४९, भाग्यश्री सोलंकी यांना ८४२ आणि अविनाश बैसाणे यांना ८१९ मते पडलीत. या निवडणुकीत दादासाहेब नगराळे आणि विकास माळी यांचा पराभव झाला. त्यांना अनुक्रमे १०५ आणि ३६५ मते मिळाली. पतसंस्थेच्या महिलांसाठी राखीव असलेल्या दोन जागांसाठी तिरंगी लढत झाली. या लढतीत गौरी बहेरे यांना ७६८ तर मनिषा सोनवणे यांना ७६० मते मिळाल्याने ते विजयी झाले. या गटात भारती सोनवणे यांना केवळ ३६८ मते मिळाले आणि त्या पराभुत झाल्या. या गटात एकुण १ हजार ९२६ मतांची मोजणी झाली. त्यापैकी ३० मते बाद ठरली. पतसंस्थेच्या इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या एका जागेसाठी सरळ लढत झाली. त्यात सुधीर भामरे यांनी ६३८ मते मिळवत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी वनराज पाटील यांना केवळ ४१४ मते मिळाली. या गटात एकुण १ हजार ९३ मतांची मोजणी झाली आणि त्यात ४१ मते बाद ठरलीत. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून शेखर साळी यांनी काम पाहिले.

## दोंडाईचात भंगार गोडाऊन भिषण आग

भिषण आग लागली होती. नागरिकांना समजताच अग्निशमन दलाच्या बाबांना पाचारण करून करण्यात आले होते. दोंडाईचा, शिरपूर, धुळे, साक्री, नंदुरबार मिळून अशा एकूण आठ अग्निशमन बंबाने आग विझविण्याचे काम सकाळी ९ वाजेपर्यंत सुरू होते. फारूख पिंजारी यांच्या मालकीचे हे गोडाऊन होते. दरम्यान या गोडाऊनला लागूनच वसीम मजिद पिंजारी यांचे घर होते. त्यांच्या घराच्या बेड रुमचा दरवाजा व कुलर खिडक्या जळून खाक झाले आहे. सदरची घटना वेळीच लक्षात आल्याचे मोठी हानी टळली म्हणावे लागेल. दरम्यान रहिवासी वस्ती मध्ये या गोडाऊनला परवानगी दिली कोणी..? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. इतर गोडाऊनच्या देखील परवानगीचे तपासणी नगर परिषद करून घ्यावी. जेणेकरून भविष्यात अशा घटना टाळता येऊ शकतात.घटनेची माहिती मिळताच अप्पर तहसीलदार संभाजी पाटील, सहा.पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण पारधी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, उपनिरीक्षक हेमंत राऊत, नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक संतोष माणिक, शहर तलाठी संजीव गोसावी, मा.उपनगराध्यक्ष नबू पिंजारी आदींनी भेट दिली आहे. अग्निशमन दलाचे सुनील सोलंकी, अरुण धनगर, शिवा सोलंकी, मनोज बोयत, चंदू राखपसरे,आदींनी आग विझविण्यासाठी मेहनत घेत होते.

## पंतप्रधान नागरी सेवा उत्कृष्टता पुरस्कार

उज्वला योजना, मुद्रा योजना, पोषण आहार योजना, स्वनिधी योजना आणि पीएम विश्वकर्मा योजना यासह केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला. केंद्र सरकारच्या सर्वेक्षणात नाशिकच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत शर्मा यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३ मध्ये करंडक, मानपत्र आणि २० लाख रुपये प्रोत्साहन निधी असे पुरस्काराचे स्वरुप असून, हा निधी नाशिक जिल्ह्यातील लोककल्याणकारी प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयोगात आणण्यात येईल.

## लाडकी बहीण योजनेचे साडेतेरा हजार मिळाले!

हे अंधेरी येथील आयडीबीआय बँक शाखेशी संलग्न आहे. त्यामूळे त्यांचे सदर योजनेचे पैसे हे अंधेरी येथील आयडीबीआय बँक शाखेत जमा झाल्याचे आढळून आले.प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांच्या मार्गदर्शनाखाली तालूक्यातील यंत्रणा यांनी पाठपुरावा करुन आज २१ एप्रिल रोजी श्रीमती रंजनाबाई सदाशिव सोनवणे यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने अंतर्गत त्यांची थकीत रक्कम रुपये १३ हजार ५०० चा धनादेश आयडीबीआय बँकेकडून देण्यात आलेला आहे.

## कार उलटून अपघात,एक ठार

गावाजवळील वैष्णवी मंगल कार्यालयाच्या वळण रस्त्यावर कारवरील नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्याच्या बाजुला असलेल्या चारीत कोसळली. या अपघातात कारमध्ये बसलेले बरकत सरदार पटेल (वय ६०) यांचा मृत्यू झाला. तर राजु पटेल, आसमा साजीद पटेल व साजीद नजीर पटेल हे तिघेही गंभीर जखमी झाले.

## पान १ वरुन

## धुळ्यात जाहीर फलक झळकू लागलेत

आहेत. धुळे शहरात देखील आता या विषयावर प्रतिक्रीया उमटु लागल्या आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या समर्थकांनी वर्दळ असलेल्या संतोषी माता मंदिर चौकात लक्षवेधी फलक उभारला. महाराष्ट्राच्या हितासाठी उध्दव बाळासाहेब ठाकरे आणि राजसाहेब ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी अपेक्षा व्यक्त करणारे फलक उभारण्यात आले आहे. त्यावर या दोन्ही नेत्यांची छबी असुन स्थानिक कार्यकर्त्यांनी आपली छबी देखील फलकावर प्रतिबिंबीत केली आहे. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोघांचे आदर्श बाळासाहेब ठाकरे आहेत. तसेच दोघांची विचारसरणी सारखी आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांच्या मतभेदाच्या भिंती पडून प्रेमाचा नवीन बंगला उभारला जावा. मराठी माणसाचे हित जोपासण्यासाठी या दोन्ही नेत्यांनी एकत्र यावे, अशी भावना मनसेच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## कॉरिडॉर प्रकल्पाला चालना द्या!

यावेळी पालकमंत्री रावल व आमदार अग्रवाल यांनी वरिष्ठ पातळीवर फोन करून लवकरात लवकर जमिनीचे स्थळ पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी यावे असे संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. दि.२८ एप्रिल रोजी धुळे जिल्ह्यामध्ये होणाऱ्या गुंतवणूक परिषदेच्या वेळी इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पाचे अधिकारी व उद्योजकांना एकत्र आणून पाठपुरावा केला जाईल अशी त्यांनी सांगितले. सदर भेटीच्या वेळेस पालकमंत्री रावल, आ.अग्रवाल, आ.भदाने यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद देऊन आम्ही पाठपुरावा करू व येणाऱ्या काळामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये कॉरिडॉर प्रकल्पाचे काम सुरू करू अशी ग्वाही त्यांनी दिली. सदर कॉरिडॉर प्रकल्प हा धुळे शहराला लागून असलेल्या दहा गावांच्या हद्दीमध्ये होणार आहे. जवळपास पंधरा हजार एकर जमिनीवर हा प्रकल्प साकारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे धुळे शहर व जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलू शकतो.

यावेळी समितीचे प्रमुख रणजीत भोसले, दादा कोर, राजेंद्र खैरनार, श्याम भामरे, रईस काजी, हरीश शेलार, विजय पाटील, पी.सी. पाटील, दिलबागसिंग राजपूत, निखिल ठाकरे, प्रभाकर पवार, कुणाल वाघ, महेंद्र शेंडगे, मनोज घोडके, वैभव पाटील आदि समितीचे सदस्य उपस्थित होते.

## चोरट्यांची नंदुरबारमध्ये चौकशी

असलेले काम/व्यवसाय, मोबाईल क्रमांक, ओळखपत्र इ. अशी संपूर्ण माहिती चौकशी पत्रात नमुद करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई देखील करण्यात येत आहे. गुन्हेगारांवर अंकुश ठेवून भविष्यात त्यांनी कुठल्याही प्रकारचा गुन्हा करु नये यासाठी त्यांना पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी यांचे मार्फत सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच येणाऱ्या उन्हाळी सुट्टीचे अनुषंगाने जिल्हयात मालमत्तेविषयक गुन्हयांमध्ये घट व्हावी, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक . श्रवण दत्त. एस यांनी उचललेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

## दहा तोळे सोने लंपास

नगर पोलीसांना मिळताच पोलिस निरिक्षक निवृत्ती पवार, सपोनि.विजय ठाकूर, पोउनि.समाधान सुरवाडे, पोहेकॉ.रफीक पठाण, शांतीलाल सोनवणे, पोकॉ. योगेश शिरसाठ, गौतम सपकाळ, मकसूद पठाण, ठसे तज्ञ धनु मोरे, सचिन सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे सुशिल शेंडे, शशि देवरे दाखल झाले.

## रब्बी धान्यास अपेक्षित दर नाही

पातळी उंचावली. पाण्यामुळे अनेक शेतक-यांनी रब्बी हंगामात निरनिराळया पिकांची पेरणी केली. सध्या रब्बी हंगामातील मका, ज्वारी, बाजरीची काढणी सुरू झाली आहे. काढणी केलेला शेतीमाल शेतकरी बाजार समितीत विक्रीस आणत आहेत. सोमवारी मका, ज्वारी, बाजरीची मोठया प्रमाणात बाजार समितीत आवक झाली. आवक वाढल्याने व्यापा-यांनी दर कमी केले. कमी दरामुळे साहजिकच शेतक-यांनी नाराजी व्यक्त केली. उत्पादीत धान्याची गुणवत्ता, उत्पादनावरील झालेला खर्च लक्षात घेता जास्तीचा दर मिळाला पाहिजे. मात्र सध्या शेतक-यांना मका आणि बाजरीला प्रतिक्विंटल २ हजार, ज्वारीला २ हजार १०० रूपये दर मिळत आहे. बाजार समितीत हरभ-याल सर्वाधिक प्रतिक्विंटल ६ हजार ४०० रूपये दर मिळत आहे. आवक लक्षात घेवुन सध्या धान्याचे दर निश्चित करण्यात आले आहेत. येणा-या काळात आवक वाढली तर दर पुन्हा कमी होवु शकतील, असेही व्यापा-यांचे म्हणणे आहे.

## सायनेत एका रात्री दोन ठिकाणी चोरी; सोन्यासह २ लाख पळविले

**सोनगीर, दि. २१ (प्रतिनिधी) : धुळे तालुक्यातील सायने येथे राहणाऱ्या वाल्मिक पाटील आणि नंदलाल सांगळे यांच्या कुलूपबंद घरात रविवारी रात्री चोरट्यांनी हात सफाई केली. या कारनाम्यात चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम, अशी एकूण तीन लाख ४४ हजाराची हात सफाई केली. धाडसी चोरी करताना चोरट्यांनी वाल्मिक पाटील यांच्या धरातील कपाट घरापासून सुमारे एक किलो मीटर पुढे नेऊन फोडले आणि त्यातील दागिने, रक्कम पळविली. उन्हाळा असल्याने वाल्मिक पाटील आणि त्यांचे कुटुंब धाब्यावर झोपलेले होते. चोरांनी त्यांना कोणताही मागमूस लागू दिला नाही, हे विशेष.**



धुळे तालुक्याच्या निरनिराळ्या गावांमध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. सध्या तापमान जास्त असल्याने ग्रामीण भागातील नागरिक गारठ्यासाठी घराच्या धाब्यावर झोपतात. सायने येथे राहणारे वाल्मिक पाटील आणि त्यांची आई घराच्या धाब्यावर झोपली होती. सकाळी वाल्मिक पाटील यांची आई सकाळी उठली तेव्हा तिला घराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. आईने आवाज दिल्यानंतर वाल्मिक पाटील धाब्यावरून खाली आले. त्यांनी घरात चाचपणी केली. तेव्हा घरात सोन्याचे दागने आणि रोख रक्कम ठेवलेले कपाट बेपत्ता असल्याचे दिसले. वाल्मिक पाटील आणि त्यांची आई चोरीबाबत बोलत असताना आजूबाजूला राहणारे नागरिक एकत्र आले. त्याचवेळी वाल्मिक पाटील यांच्या घरापासून काही अंतरावर राहत असलेल्या नंदलाल सांगळे यांच्या घराचा दरवाजाही तोडलेल्या अवस्थेत दिसला. नागरिकांनी वाल्मिक सांगळे यांच्या भावाला याबाबत कल्पना दिली. भावाने गावी गेलेल्या वाल्मिक सांगळे यांना त्यांच्या घरात चोरी झाल्याची माहिती दिली. काही तासाने वाल्मिक सांगळे घरी आले. त्यांनी धरात पाहिल्यानंतर कपाट तोडलेले दिसले. कपाटात असलेले दागने आणि रक्कम मात्र बेपत्ता असल्याचे लक्षात आले. दरम्यानच्या काळात वाल्मिक पाटील आणि इतरांनी त्यांच्या घरातील कपाट गेले कुठे, असा प्रश्न उपस्थित करीत शोध घेण्यास सुरूवात केली. तेव्हा घरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर वाल्मिक पाटील यांच्या घरातील कपाट पडलेले दिसले. कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने आणि एक लाखाची रक्कम मात्र नव्हती. अशीच स्थिती सांगळे यांच्या घरातील कपाटाची होती. दोन्ही ठिकाणी हातसफाई करताना चोरांनी एकूण १ लाख ४४ हजाराचे दागिने आणि दोन लाखांची रोकड लांबविली. या प्रकरणी वाल्मिक पाटील आणि नंदलाल सांगळे यांनी सोनगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## शहादा तालुक्यात भाजपच्या तीन मंडळ अध्यक्षांची निवडणूक उत्साहात संपन्न; पदाधिकाऱ्यांमध्ये चैतन्य

**शहादा, दि.२१ (का.प्र.)- भारतीय जनता पक्षाने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून संघटनात्मक बदल घडून आणायचे ठरवले असून दि.२० एप्रिल रोजी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मंडळ अध्यक्षांच्या निवडणुका संपन्न झाल्या.शहादा तालुका मंडळ अध्यक्ष निवडणूक रविवारी संपन्न झाली.**



शहादा तालुक्यातील तीन मंडळाच्या निवडणुकांसाठी नियुक्त ग्रामीण निवडणूक अधिकारी बळीराम पाडवी आणि शहर निवडणूक अधिकारी प्रकाश चौधरी यांनी तिन्ही अध्यक्षांची नेमणूक केली.यांत शहादा शहर अध्यक्षपदी ज्ञानेश्वर चौधरी यांची नियुक्ती झाली. लोणखेडा मंडळ अध्यक्षपदी नितीन पाटील यांची तर म्हसावद मंडळाच्या अध्यक्षपदी विश्वास ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार राजेश पाडवी, जिल्हाध्यक्ष निलेश माळी,प्रकाश चौधरी,बळीराम पाडवी, जिल्हा उपाध्यक्ष प्रा.मकरंद पाटील, विनोद जैन यांची उपस्थिती होती.या निवडणुकीमध्ये निवडणूक प्रमुखांनी तिनही मंडळाच्या अध्यक्षांची नियुक्तीपत्र देऊन घोषणा केली.उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंडळ अध्यक्षांचे स्वागत केले.यावेळी मार्गदर्शन करतांना आमदार राजेश पाडवी यांनी या निवडणुका आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत आणि प्रत्येक काम करणाऱ्या कार्यकर्त्याला याठिकाणी पक्षांमध्ये चांगलं स्थान देण्यात येईल.पक्ष मजबूत करण्यासाठी आणि येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आपण कामाला लागावे असे त्यांनी सांगितले. प्रा.मकरंद पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने लोकसभा विधानसभा निवडणुकांमध्ये मेहनत घेतलेली आहे आणि त्याचं फळ त्यांना आता मिळत आहे.आता पुढील निवडणूकांसाठी नवनिर्वाचित अध्यक्ष,कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी व पक्ष संघटन मजबूत करावे असेही सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजबसिंग गिरासे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर चौधरी यांनी मानले.

## सुभद्राबाई पाठकांच्या पार्थिवावर आज अग्निसंस्कार



धुळे, दि.२१- श्रीमती सुभद्राबाई शांताराम पाठक रा.बेटावद ता.शिंदखेडा (वय ९५) यांचे आज वार्धक्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी दि.२२ रोजी सकाळी नऊ वाजता प्रभात अपार्टमेंट, प्रभात नगर, देवपूर येथील राहत्या घरा पासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बेटावद माजी उपसरपंच ॲड.वसंत पाठक यांच्या त्या मातोश्री होत.

**पाहिजेत**
सुशिक्षित, होतकरु व निर्व्यसनी मॅनेजर आणि साफसफाई कामगार पाहिजे.
मॅनेजर पगार- १०,००० प्रति महिना
साफसफाई कामगार (वेटर) ७,०००/- प्रति महिना
पत्ता : आदर्श लॉज, जेलरोड, बस स्टॅन्ड जवळ, धुळे

**पाहिजेत**
12 वी पास असलेली हुशार व अनुभवी मुले लावणे आहेत. जागा-०५
पत्ता : प्रताप नाना महाले खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती, मोराणे ता.जि.धुळे (कांदा मार्केट)
-: संपर्क :-
विनोद सोमनाथ चौधरी
9623962235

**पाहिजेत**
टॅली ऑपरेटर ३ जागा
येतांना फोटो बायोडाटा घेवून येणे.
अभिराम एंटरप्राईजेस
कांती कॉम्प्लेक्स, ग.नं.४, धुळे

**पाहिजे**
धुळे येथे हॉस्पिटलसाठी असिस्टंट पाहिजे. फोर व्हिलर चालवता येणे आवश्यक.
-: संपर्क :-
9420536444
9359005053

**पाहिजेत**
कामासाठी मुले लावणे आहेत
संपर्क :- धुळे
9421526579

**पाहिजेत**
१) केमीस्ट - १ BSc chemistry
२) टॅली ऑपरेटर -१
३) सुपरवायझर - १
अर्जासह समक्ष भेटा!
स.११ ते १, सं.५ ते ७
अशोका कॉस्मेटिक्स
ई-५७, एमआयडीसी, अवधान, धुळे

**पाहिजेत**
नवीन ऑफिस करिता मुला/मुलींची डायरेक्ट भरती
पात्रता- १० वी पास/नापास ते पदवीधर व १८ ते ३० वर्षे पगार ७५००/- ते २५०००/- हजार
रहाणे+जेवण मोफत
संपर्क :- पत्ता:- वाडीभोकर रोड, धुळे मो.९६५७६०८४५९

**चालविणे देणे आहे**
लॉजिंग, बिअर बार किचन चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
9923044452

**पाहिजेत**
मेडीकल होलतेल दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) मदतनिस माल वाटपसाठी
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
9422287821

**प्लॉट विकणे आहे**
सर्व्हे नं.९१, प्लॉट नं.२४, माहेश्वरी सोसायटी, ८५० स्के.फूट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालयाजवळ, धुळे
रमेश गंगाराम साळवे
7066559455
9422288948

**पाहिजेत**
नामांकित कन्स्ट्रक्शन कंपनीत ऑफिस क्लर्क व साईट सुपरवायझर पाहिजेत
(अनुभव असल्यास प्राधान्य) आकर्षक पगार मिळेल.
पात्रता : शिक्षण, साईट सुपरवायझरसाठी डिग्री डिप्लोमा
ऑफिस क्लर्कसाठी Male & Female
संपर्क :- 9106233087

**पाहिजेत**
हॉस्पीटलसाठी असिस्टंट-५, सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.
-: संपर्क :-
8329467904
9890992100

**पाहिजेत**
हेल्पर/सॉर्टर/डिलेव्हरी बॉय पाहिजे पगार १०,०००/-
-: संपर्क :-
एमआयडीसी, धुळे
8879442989

**शेती विकणे आहे**
गाव- विटाई ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गट नं.८/१
क्षेत्रफळ : दिड बिघा सामायिक विहीर
संपर्क : दिलीप पाटील
9529553175

**कामगार पाहिजेत**
अवधान एमआयडीसी मध्ये फेब्रिकेशन कारखान्यात कामगार पाहिजेत.
-: संपर्क :-
9921053999




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०